महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ ३ २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३४८/**१७१८५**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in
दिनांक : २०/०६/२०१९

परिपत्रक

विषय :- निवडणुकीच्या कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना व मृत झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३, दिनांक - ११ एप्रिल २०१९.
२) अवर सचिव,महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र. १७२/ ऊर्जा-२, दि.३० एप्रिल, २०१९

अवर सचिव,महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७२/ऊर्जा-२, दि.३० एप्रिल,२०१९ तसेच शासन निर्णय क्र. सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३, दिनांक - ११ एप्रिल २०१९ अन्वये निवडणुकीच्या कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना व मृत झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. सोबत दिनांक ११.०४.२०१९ संदर्भिय शासन निर्णयाची प्रत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

२. सांघिक कार्यालय तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयातील आहरण व संवितरण प्राधिकारी यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णय क्र.सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३, दिनांक - ११ एप्रिल, २०१९ मधील सूचना कंपनीतील जे अधिकारी/कर्मचारी निवडणूक विषयक विविध कर्तव्यावर नेमण्यात आले आहेत अशांच्या बाबतीत लागू राहील.

३. निवडणूक विषयक विविध कर्तव्यावर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी कंपनीच्या ज्या आस्थापनेवर कार्यरत आहेत अशा कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव संबधीत आस्थापना प्रमुखांनी उपरोक्त शासन निर्णयानुसार शासनाने नेमणूक केलेला सक्षम अधिकारी अथवा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडे मंजूरी करीता सादर करावेत.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (सेवानिवृत्त)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

C:\Users\admin\Desktop\Exgratia for accident of on election duty..docx

प/09 R - 27410/2019

महाराष्ट्र शासन

OFFICE OF CMD, MSEDCL				
DIR-FIN	DIR-OP	DIR-COM	DIR-PROJ	DIR-HR
ED-FIN	ED-DIST	ED-COM	ED-PROJ	ED-HR
ED-BR	ED-SE	ED-INFRA	CGM-IT	CLA
COM-SEC	FOR NECESSARY ACTION PLEASE			SE-CSBI

क्र.: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७२/ऊर्जा-२
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दुरध्वनी क्र.०२२-२२८८२७३५
दिनांक :- ३० एप्रिल, २०१९.

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या., हॉंगकॉंग बॅंक इमारत, ४ था मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
महासंचालक,
महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,से. नं. १९१ फेज -१,म्हाडा वाणिज्य संकुल,
दुसरा मजला, त्रिदल नगर समोर, येरवडा, पुणे ४११ ००६
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १,
कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.
मुख्य विद्युत निरीक्षक,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, तिसरा मजला, प्रशासकीय इमारत,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई- ४०० ०७१.

Director (HR) OFFICE
CGM (HR)
CGM (T/E)
CIO
CIRO
E, Eng (HRD)
(T & S)

महावितरण मुंबई
सापवि ८ र.व.का.
आवक/जावक
नंबर. 114
दिनांक: 23/05/1

विषय :- निवडणुकीच्या कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या व मृत झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

AGM (HR-O&M

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीईएल-२०१९/प्र.क्र. ४७०/१९/३३, दि. ११.०४.२०१९ ची प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

CGM (T/E)
G.M. (HRMS)
~~G.M.~~ (HR-PLG.)
G.M. (HR)
A.G.M. (HR-O&M/RC/BCR)
A.G.M. (NTE/DC/MPR)
MGR (HR-PA Cell)
Dy. EE (HRD)

आपला,

(म. मा. मोरवे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

निवडणुकीच्या कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना व मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११ एप्रिल, २०१९

वाचा : भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक २१८/६/२०१९-EPS, दिनांक १०.०४.२०१९

शासन निर्णय :-

भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितील संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या किंवा राज्याच्या बाबतीत विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या एक किंवा अनेक जागा भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुका, म्हणजेच राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद व विधानसभेच्या सार्वत्रिक आणि पोट निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणावर अधिकारी/कर्मचारी वर्ग निवडणूक विषयक विविध कर्तव्यावर नेमण्यात येतो. निवडणूक कर्तव्ये ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण कर्तव्यापेक्षा वेगळ्या प्रकारची असतात. ती केवळ मर्यादीत वेळेत पूर्ण करावयाची नसतात, तर ही कर्तव्ये पार पाडताना निवडणूक कर्मचाऱ्यांना जोखीम आणि धोका यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे निवडणूक कर्तव्ये बजावताना निधन पावलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना तसेच निवडणूक कर्तव्यावर असताना कोणतीही दुर्दैवी घटना (Any mishap) घडून जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अथवा त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने सहानुभूतिपूर्वक विचार करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

सानुग्रह अनुदानाचा तपशिल

अ.क्र.	तपशिल	सानुग्रह अनुदान रक्कम (रुपये)
१	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस	१५,००,०००/-
२	निवडणुकीच्या वेळी कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग अथवा शस्त्रास्त्राचा हल्ला (Road Mines, Bomb Blasts, Armed Attach etc.) यामध्ये मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस	३०,००,०००/-
३	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/ कर्मचारी (उदा. हात, पाय किंवा डोळा गमविणे इ.)	७,५०,०००/-
४	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग पेरणी, शस्त्रास्त्राचा हल्ला इ. (Road Mines. Bomb Blasts, Armed Attack etc.) यामध्ये कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/ कर्मचारी (उदा. हात, पाय किंवा डोळा गमविणे इ.)	१५,००,०००/-

२. या शासन निर्णयासाठी निवडणूक कर्तव्य याचा अर्थ संबंधीत अधिकारी/कर्मचारी हे निवडणुकीच्या कर्तव्यासाठी आपल्या घरातून /कार्यालयातून बाहेर पडल्यापासून ते निवडणुकीशी संबंधीत कर्तव्ये पार पाडून आपल्या कार्यालयात/घरी परत येईपर्यंतचा कालावधी असा समजण्यात यावा. निवडणुकीशी संबंधीत कर्तव्ये यामध्ये निवडणुकीच्या कामासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा देखील समावेश असेल. या कालावधीमध्ये कोणतीही दुर्दैवी घटना (Any mishap) घडल्यास ती निवडणूक कर्तव्यावर असताना घडलेली आहे असे समजण्यात येईल. तथापि, निवडणूक कर्तव्य व घडलेला मृत्यु यामध्ये नैमित्तिक संबंध (Casual Connection) असावा.

३. निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, निम शासकीय इतर प्राधिकरण तसेच इतर खाजगी आस्थापना की ज्यातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश आहे.

४. हे सानुग्रह अनुदान शासनाच्या प्रचलित सोई सुविधा, अनुज्ञेय लाभ या व्यतिरिक्त आहे. यामध्ये सदर अधिकारी/कर्मचारी यांना मिळणाऱ्या नियमित लाभाचा समावेश नाही.

५. हा शासन निर्णय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम,१९५१ च्या कलम २ (१) (ड) मध्ये नमूद केलेल्या सर्व निवडणुकांकरिता लागू राहील.

६. सदर सानुग्रह अनुदान अधिकारी/कर्मचाऱ्यांना अथवा त्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या आर्थिक मदतीसाठी येणारा खर्च हा-

(अ) संसदेच्या निवडणुकांसाठी मुख्य लेखाशीर्ष २०१५- निवडणुका, उपशीर्ष १०५-संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च (००)(०१) संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, १३-कार्यालयीन खर्च, मागणी क्रमांक ए-२ (२०१५००५९) तसेच

(ब) विधानसभा/विधान परिषद निवडणुकीसाठी, मुख्य लेखाशीर्ष २०१५- निवडणुका, उपशीर्ष १०६-राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च (००)(०१) राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, १३ कार्यालयीन खर्च, मागणी क्रमांक ए-२ (२०१५००६८), तसेच

(क) लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुका एकाच वेळेस घेण्यात आल्या तर मुख्य लेखाशीर्ष २०१५-निवडणुका, उपशीर्ष १०४-लोकसभा, राज्य संघराज्य क्षेत्र विधानमंडळाच्या निवडणुका एकाच वेळेस घेण्याचा खर्च, (००)(०१) लोकसभा, राज्य संघराज्य क्षेत्र विधानमंडळाच्या निवडणुका एकाच वेळेस घेण्याचा खर्च, १३ कार्यालयीन खर्च, मागणी क्रमांक ए-२ (२०१५००४१) या यथास्थित लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा व त्या त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सानुग्रह अनुदानाकरिता लागू कालावधी हा निवड़णूक घोषित झाल्याच्या तारखेपासून सुरु होईल.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: १५१/१९/व्यय-४, दिनांक ११.०४.२०१९ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४१२१०५६४१४३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ANIL NANSING
VALVI

Digitally signed by ANIL NANSING VALVI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=1a7c28200f6d58206324d8086ffcf99758c115aada508a74
37f2ae5d9fa1ba5d, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=328a78fb26991ef7b9493ea647f585c65b1cf01913a
e44b41ffee5cc8464f2f1, ou=NA, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=ANIL NANSING VALVI
Date: 2019.04.12 11:30:22 +05'30'

(अ.ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रति,

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई
७. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. सर्व महानगरपालिका आयुक्त,
१२. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
१३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४. सर्व मंत्रालयीन विभागांतर्गत सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमख
१५. निवड नस्ती.